ePaper

वर्ष - 9 । अंक -70 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

www.mahaenews.com । रविवार, दि. 2 नोव्हेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## जग हादरलं! डोनाल्ड ट्रम्प सर्वात भयानक हल्ला करणार



आतील पानांत

- कोचला मिठी मारून कौर रडली!
- श्रेयस अय्यरला रुग्णालयातून डिस्चार्ज!
- भारतीय तरूणाची ग्वाटेमाला हत्या!
- सार्वभौमत्वासाठी सामूहिक सुरक्षा आवश्यक

## पुराव्यांनिशी न्यायालयात जाणार | मतदारयादी घोळावर उद्धव ठाकरे आक्रमक

# ‘सत्याचा मोर्चा’तून लोकशाहीचा आवाज!

### राज ठाकरे, थोरात यांचीही संतप्त प्रतिक्रिया; ‘सत्याचा मोर्चा’त महाविकास आघाडी आणि मनसेची ताकद एकवटली

। मुंबई । प्रतिनिधी ।
महाईन्यूज

**राज्यातील मतदारयाद्यांमधील मोठ्या घोळाच्या पार्श्वभूमीवर शनिवारी मुंबईत काढण्यात आलेल्या ‘सत्याचा मोर्चा’ने संपूर्ण राज्याचे लक्ष वेधून घेतले. या मोर्चात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) प्रमुख उद्धव ठाकरे, मनसे अध्यक्ष राज ठाकरे, काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे नेते अशोक चव्हाण यांच्यासह महाविकास आघाडीतील नेत्यांनी एकत्र येत निवडणूक आयोगावर जोरदार टीका केली.**



या मोर्चातून उद्धव ठाकरे यांनी जाहीर केले की, “आमच्याकडे मतदारयादीतील अनियमिततेचे ठोस पुरावे आहेत आणि आता आम्ही हे पुरावे घेऊन न्यायालयात जाणार आहोत. न्यायालयात तरी न्याय मिळतो का हे पाहू; पण इतके साक्षीपुरावे दिल्यानंतर तरी जनतेला न्याय मिळालाच पाहिजे.”

**न्यायालयात लढाई, पण शेवटचा निर्णय जनतेचा — उद्धव ठाकरे**

उद्धव ठाकरे यांनी आपल्या भाषणात निवडणूक आयोगावर थेट निशाणा साधत म्हटले की, “मतदार याद्यांमधील गैरव्यवहार हे लोकशाहीवरच आघात आहेत. रोज नवीन पुरावे समोर येत आहेत, तरीही आयोग काहीच कारवाई करत नाही. आता आम्ही न्यायालयाचा दरवाजा ठोठावणार आहोत. जर न्यायालयातही न्याय मिळाला नाही, तर जनतेचे न्यायालय सक्षम आहे. जनतेने आता जबाबदारी घ्यावी. मतचोर दिसला, की त्याला लोकशाही मार्गाने फटकवावे.”

त्यांनी पुढे हल्लाबोल करत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यावर थेट निशाणा साधला — “आता जागे राहा, नाही तर ॲनाकोंडा येईल,” अशा इशाऱ्यात त्यांनी शहांना टोला लगावला.

उद्धव ठाकरे म्हणाले, “संयुक्त महाराष्ट्र चळवळीनंतर पहिल्यांदाच महाराष्ट्रात सर्व पक्ष एकत्र आले आहेत. ही केवळ विरोधी पक्षांची एकजूट नाही, तर लोकशाही व संविधानाचे रक्षण करणाऱ्या शक्तींची एकजूट आहे. आज फक्त ठिणगी दिसतेय, पण ही ठिणगी वणव्यात बदलणार आहे.”

**“दुबार मतदार दिसला की फोडून काढा!” — राज ठाकरे**

मोर्चात मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी नेहमीप्रमाणे आक्रमक भाषेत आपली भूमिका मांडली. त्यांनी जनतेला थेट आवाहन केले — “दुबार मतदारांचे चेहरे ओळखा. घराघरांत जा, याद्यांवर काम करा. आणि जर मतदानाच्या दिवशी दुबार-तिबार मतदार मतदानाला आले, तर त्यांना तिथेच फोडून काढा. बडवून मगच पोलिसांच्या ताब्यात द्या!”

त्यांच्या या वक्तव्यावर सभागृहात उपस्थित कार्यकर्त्यांनी जोरदार टाळ्यांचा गजर केला. राज ठाकरे म्हणाले, “सगळीकडे मतदार याद्यांमध्ये भयानक घोळ आहे. अनेक ठिकाणी मृत व्यक्तींची नावेही यादीत आहेत, काही ठिकाणी एका व्यक्तीचे तीन-तीन नावाने मतदार आहेत. हे लोकशाहीला काळिमा फासणारे प्रकार आहेत. आयोगाने जर यावर कारवाई केली नाही, तर जनतेलाच पुढे यावे लागेल.”

**“आयोगाचे उत्तर म्हणजे इतिहासातील बोगस उत्तर” — बाळासाहेब थोरात**

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी या मोर्चात आयोगावर जोरदार हल्लाबोल करताना म्हटले — “आयोगाने मतदार याद्यांबाबत दिलेले उत्तर हे इतिहासातील सर्वात बोगस उत्तर ठरेल. आज निवडणुकीच्या पवित्रतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.”

## मतदार यादीतून ठाकरे कुटुंबाचे नाव हटवण्याचा प्रयत्न!



‘सत्याचा मोर्चा’दरम्यान माजी मुख्यमंत्री आणि शिवसेना (उबाठा) प्रमुख उद्धव ठाकरे यांनी धक्कादायक दावा केला की, त्यांच्या तसेच संपूर्ण ठाकरे कुटुंबाचे नाव मतदार यादीतून हटवण्यासाठी मोठं कारस्थान रचलं जात आहे. या खुलाशामुळे राज्याच्या राजकारणात खळबळ उडाली आहे.उद्धव ठाकरे म्हणाले, “दोन दिवसांपूर्वी मातोश्रीवर निवडणूक आयोगाची माणसं आली. त्यांनी सांगितलं की माझा टेलिफोन नंबर खोटा आहे. तपासल्यावर कळलं की माझ्या नावाने २३ तारखेला सक्षम ॲपद्वारे अर्ज करण्यात आला होता. आम्ही असा कोणताही अर्ज केला नाही.” त्यांनी आरोप केला की, खोट्या मोबाईल क्रमांकावरून ओटीपी काढून माझ्या आणि घरातील चार सदस्यांची नावे मतदार यादीतून हटवण्याचा प्रयत्न झाला.

## “खोटेपणा उघड करणाऱ्यांवर गुन्हे दाखल होतात-शरद पवारांचा आरोप



‘सत्याचा मोर्चा’दरम्यान राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांनी सरकारवर आणि निवडणूक व्यवस्थेवर थेट हल्लाबोल केला. मतदार याद्यांतील गोंधळ दुरुस्त होईपर्यंत निवडणुका घेऊ नयेत, अशी मागणी करत त्यांनी लोकशाही वाचवण्याचा निर्धार व्यक्त केला. पवार म्हणाले, “१९७८ च्या संयुक्त महाराष्ट्र चळवळीची आठवण या मोर्चाने करून दिली. आपण स्वतःसाठी काही मागत नाही, तर संविधानाने दिलेला मतदानाचा अधिकार जतन करण्यासाठी एकत्र आलो आहोत.” ते पुढे म्हणाले, “काही ठिकाणी लोकांनी बनावट आधार कार्ड आणि मतदार नोंदणीतील घोळ उघड केले.

अजित पवारांचं विधान वादात

उपमुख्यमंत्री अजित पवार यांची माहिती

# सारखंच फुकटात कसं मिळेल?

## आम्ही काय भिकारी आहोत का?

।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**शेतकरी कर्जमाफीचा मुद्दा सध्या राज्यात चर्चेत आला आहे. विद्यमान सत्ताधारी महायुतीनं निवडणुकांच्या काळात कर्जमाफी करण्याचं आश्वासन दिलं होतं. त्यानुसार ती करावी, या मागणीसाठी बच्चू कडूंनी नागपूरपर्यंत शेतकऱ्यांचा मोर्चा काढला.**



अखेर बुधवारी सरकारशी झालेल्या वाटाघाटींनंतर पुढील वर्षी ३० जूनपर्यंत कर्जमाफीसंदर्भात निर्णय घेण्याचा शब्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी बच्चू कडूंना दिला. त्यामुळे शेतकऱ्यांसाठीच्या कर्जमाफीचा मुद्दा महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपूर्वी चर्चेत आलेला असतानाच अजित पवारांनी याबाबत केलेलं एक विधान वादात सापडलं आहे.शेतकरी कर्जमाफी वारंवार कशी मिळणार? असा प्रश्न उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी उपस्थित केला आहे. शेतकऱ्यांनी सारखंच कर्ज फुकटात मिळण्याची सवय लावून घेऊ नये, असं आवाहनदेखील अर्थखात्याची जबाबदारी असणाऱ्या अजित पवारांनी राज्यातल्या शेतकऱ्यांना केलं आहे. शुक्रवारी बारामतीमध्ये एका जाहीर कार्यक्रमात बोलताना अजित पवारांनी केलेल्या या विधानावरून आता वाद निर्माण झाला आहे."कर्जमाफीबाबत जूनला निर्णय घ्यायचं ठरलंय. तो कसा होईल ते आम्ही एप्रिलमध्ये तुम्हाला सांगू. पण तुम्हीसुद्धा शून्य टक्के व्याजदराने पैसे दिल्यावर वेळच्या वेळी पैसे परत करण्याची सवय लावा ना. सारखंच फुकटात, सारखंच माफ.. कसं व्हायचं? असं चालत नाही. एकदा शरद पवारांनी कर्जमाफी दिली, एकदा देवेंद्र फडणवीसांनी दिली, एकदा उद्धव ठाकरेंच्या सरकारमध्ये आम्ही दिली, आता पुन्हा आम्हाला निवडून यायचं होतं, म्हणून सांगितलं आम्ही माफ करू. लोक म्हणतात तुम्ही सांगितलं होतं माफ करू, आता करा माफ", असं अजित पवार यावेळी म्हणाले.दरम्यान, अजित पवारांच्या या विधानावरून त्यांचे पुतणे रोहित पवार यांनी प्रतिप्रश्न केला आहे. "शेतकरी वेळच्या वेळी कर्ज भरतो, पण सरकारच्या उदासीन धोरणामुळे शेतकऱ्यांचा खर्च देखील निघत नसेल तर शेतकऱ्याने कर्ज फेडायचे तरी कसे?" असा सवाल रोहित पवारांनी एक्सवर केलेल्या पोस्टच्या माध्यमातून केला आहे.निवडणुका होत्या म्हणून आश्वासन दिले, शेतकऱ्यांनी आर्थिक शिस्त लावावी, वेळच्या वेळी कर्ज फेडावे यासंदर्भात आपण केलेलं वक्तव्य अत्यंत निंदाजनक असून शेतकऱ्यांची खिल्ली उडवणारं आहे. संगतीचा हा परिणाम असला तरी आपल्याकडून ही अपेक्षा नव्हती! शेतकऱ्यांना दिलासा देता येत नसेल तर किमान शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ तरी चोळू नका. आता मीठ चोळलं तर दिलगिरी व्यक्त कराल, ही अपेक्षा! महत्वाचं म्हणजे हे सगळं बघितलं तर काल सरकारने दिलेलं आश्वासन म्हणजे बुडणाऱ्या बँकेचा कधीही न वटणारा POST DATED चेक आहे , असंच म्हणावं लागेल", असंही रोहित पवारांनी नमूद केलं आहे.दरम्यान, अजित पवारांच्या विधानावर राजू शेट्टी यांनीदेखील तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. "शेतकरी काही भीक मागत नाही. मला अजित पवारांचं मान्य आहे. पण त्यासाठी आधी सरकार म्हणून अजित पवारांनी एक व्यवस्था करावी. उत्पादन खर्चापेक्षा कमी किमतीत शेतमाल विकण्याची वेळ येणार नाही अशी धोरणं सरकारनं तयार करावीत. त्यांच्याकडे वारंवार कर्जमाफी मागायला आम्ही काय भिकारी नाही", असं राजू शेट्टी शेतकऱ्यांच्या वतीने अजित पवारांना म्हणाले आहेत.

### काय म्हणाले अजित पवार?

निवडणुका होत्या म्हणून आश्वासन दिले, शेतकऱ्यांनी आर्थिक शिस्त लावावी, वेळच्या वेळी कर्ज फेडावे यासंदर्भात आपण केलेलं वक्तव्य अत्यंत निंदाजनक असून शेतकऱ्यांची खिल्ली उडवणारं आहे. संगतीचा हा परिणाम असला तरी आपल्याकडून ही अपेक्षा नव्हती! शेतकऱ्यांना दिलासा देता येत नसेल तर किमान शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ तरी चोळू नका. आता मीठ चोळलं तर दिलगिरी व्यक्त कराल, ही अपेक्षा! महत्वाचं म्हणजे हे सगळं बघितलं.

# भाजपचा पुणे पालिकेवर दरोडा!

## ठेकेदाराचा 500 कोटींचा फायदा करून दिल्याचा मविआचा आरोप

। पुणे ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**शहरातील सहा जुन्या मैलापाणी शुद्धिकरण प्रकल्पांच्या (एसटीपी) नूतनीकरणासाठी एक हजार २२३ कोटी रुपयांच्या मंजूर केलेल्या निविदांद्वारे भारतीय जनता पक्षाने महापालिकेवर दरोडा घातल्याची टीका काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने केली आहे. या निविदांद्वारे भाजपच्या पदाधिकाऱ्याच्या मालकीच्या असलेल्या ठेकेदार कंपनीला ५०० कोटी रुपयांचा फायदा करून देण्यात आल्याची टीका महाविकास आघाडीने केली आहे**




केंद्र सरकारच्या अमृत २.० या योजनेंतर्गत महापालिकेच्या सहा मैलापाणी शुद्धिकरण प्रकल्पांच्या नुतनीकरणाचे काम करण्यात येणार आहे. त्यामध्ये दोन प्रकल्प उभारण्यात येणार असून, चार प्रकल्पांचे नुतनीकरण करण्यात येणार आहे. महापालिका प्रशासनाने त्यासाठी एक हजार २२३ कोटी रुपयांच्या निविदांना स्थायी समितीच्या बैठकीत शुक्रवारी (३१ ऑक्टोबर) मान्यता दिली. ही मान्यता देताना प्रकल्पाचा एकूण खर्च, त्यासाठी ठेकेदाराकडून १५ वर्षांसाठी करण्यात येणारी गुंतवणूक, त्यावर येणारे व्याज आणि अन्य खर्च लक्षात घेता, या प्रकल्पासाठी १८६९ कोटी ५० लाख रुपयांच्या खर्चाचा करारनामा करण्यात येणार असल्याचे स्थायी समितीने नमूद केलेल्या प्रस्तावात नमूद केले आहे. महापालिकेकडून पहिल्यांदाच हे प्रकल्प 'हॅम' (हायब्रिड ॲन्युटी मॉडेल) या तत्त्वावर प्रकल्प राबविण्यात येत आहे. निविदा मंजूर झालेल्या ठेकेदार कंपनीचे मालक भाजपचे पदाधिकारी आहेत.

### उच्च न्यायालयात दाद मागणार

केंद्र आणि राज्यातील भाजप नेत्यांनी महापालिकेत हस्तक्षेप करून ही निविदा मंजूर केली आहे. आयुक्तांनी ही निविदा प्रक्रिया रद्द करावी, अशी त्यांना विनंती आहे. याविरोधात सोमवारी महापालिका इमारतीच्या प्रवेशद्वारावर आंदोलन करण्यात येणार आहे. ही निविदा प्रक्रिया रद्द न केल्यास उच्च न्यायालय दाद मागणार असल्याचे जगताप म्हणाले. नागपूरच्या उद्योजकासाठी महापालिका प्रशासनावर दबाव आणून या निविदा मान्य केल्याचा आरोप महाविकास आघाडीने केला आहे. राजकीय दबावाखाली महापालिकेच्या विद्युत व ड्रेनेज विभागाच्या अधिकाऱ्यांनी डोळे बंद करून या प्रकल्पाच्या पूर्णगणनपत्रकावर सह्या केल्या आहेत.

## पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुक: क्षेत्रीय कार्यालयानिहाय प्राधिकृत अधिकारी नियुक्त

# प्रारूप मतदार यादी 6 नोव्हेंबरला प्रसिद्ध होणार!

## १४ नोव्हेंबरपर्यंत नागरिकांना हरकती व सूचना नोंदविण्याची संधी

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड महापालिकेच्या नियोजित सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने महापालिकेच्या कार्यक्षेत्रातील विधानसभा मतदारसंघांची प्रभागनिहाय विभाजित करण्यात आलेली प्रारूप मतदार यादी ६ नोव्हेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. या यादीवर ६ नोव्हेंबर ते १४ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत नागरिकांना हरकती व सूचना नोंदविण्याची संधी आहे.**




प्रारूप मतदार यादीवरील हरकती व सूचनांवर छाननी, सुनावणी व निर्णय घेण्यासाठी क्षेत्रीय कार्यालयानिहाय सहशहर अभियंता अजय सूर्यवंशी, अनिल भालसाकळे, माणिक चव्हाण आणि सुनील भागवानी यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. याबाबतचे आदेश अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांच्या स्वाक्षरीने जारी करण्यात आले आहेत.

महापालिकेच्या नियोजित सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने महापालिकेच्या कार्यक्षेत्रातील २०५-चिंचवड विधानसभा, २०६-पिंपरी विधानसभा, २०७-भोसरी विधानसभा आणि २०३-भोर विधानसभा मतदारसंघ (ताथवडे गाव) या विधानसभा मतदारसंघांच्या मतदार यादी प्रभागनिहाय विभाजन करून तयार करण्यात आलेली प्रारूप मतदार यादी ६ नोव्हेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. या यादीवर ६ नोव्हेंबर ते १४ नोव्हेंबर २०२५ या काळात नागरिक आपल्या हरकती व सूचना महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील मतदार यादी कक्षात तसेच सर्व ८ क्षेत्रीय कार्यालयांत प्रत्यक्ष दाखल करू शकतात. या यादीवरील हरकती व सूचनांवर छाननी, सुनावणी व निर्णय घेण्यासाठी सहशहर अभियंता दर्जाच्या अधिकाऱ्यांची क्षेत्रीय कार्यालयानिहाय प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

यामध्ये 'अ' व 'फ' क्षेत्रीय कार्यालयासाठी अजय सूर्यवंशी, 'ब' व 'ग' क्षेत्रीय कार्यालयासाठी अनिल भालसाकळे, 'ड' व 'ह' क्षेत्रीय कार्यालयासाठी माणिक चव्हाण आणि 'क' व 'इ' क्षेत्रीय कार्यालयासाठी सुनील भागवानी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या प्राधिकृत अधिकाऱ्यांना सहाय्य करण्यासाठी संबंधित क्षेत्रीय अधिकारी व कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांची सहायक प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. संबंधित अधिकारी प्रारूप मतदार यादीबाबत नमुना 'अ' व 'ब' मध्ये प्राप्त होणाऱ्या सर्व हरकती व सूचनांची तपासणी करून आवश्यक अहवाल प्राधिकृत अधिकाऱ्यांना सादर करावा, असेही आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

# मोशी प्राधिकरणातील वीजग्राहक नागरिकांना दिलासा!

## 'आरएमयू' बसवण्याच्या कामाला सुरुवात; भाजपा आमदार महेश लांडगे यांचा पाठपुरावा

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**मोशी राधिकरणातील सेक्टर क्रमांक ४, ६, ९ तसेच गंधर्व नगरी परिसरातील नागरिकांना गेल्या काही महिन्यांपासून वारंवार वीजपुरवठा खंडित होण्याचा मोठा त्रास सहन करावा लागत होता. या परिसराला महावितरणच्या सेक्टर १० उपकेंद्रातून कार्यान्वित जलवायु विहार या उच्चदाब विद्युत वाहिनीमार्फत वीजपुरवठा केला जातो. परंतु, या वाहिनीवर कुठेही तांत्रिक बिघाड झाल्यास संपूर्ण लाईन बंद ठेवावी लागे, त्यामुळे पूर्ण परिसर अंधारात जात होता. ही समस्या आता कायमस्वरुपी सुटणार आहे.**



भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या पाठपुराव्यामुळे तीन ठिकाणी 'आरएमयू' बसवण्याच्या कामाला सुरुवात करण्यात आली. आज या कामाची पाहणी कामगार नेते सचिन लांडगे यांनी केली. यावेळी माजी नगरसेविका नम्रता लोंढे, सामाजिक कार्यकर्ते योगेश लोंढे आणि सहकारी उपस्थित होते.

वीज ग्राहकांच्या या समस्येची दखल घेत आमदार महेश लांडगे यांनी महावितरण अधिकाऱ्यांसोबत चर्चा करून तात्काळ तोडगा काढण्याचे निर्देश दिले होते. त्यानंतर कार्यकारी अभियंता श्री. देवकर आणि सहाय्यक अभियंता श्री. नरवडे यांच्यासह जागेचे सर्वेक्षण करण्यात आले. पाहणीदरम्यान तीन ठिकाणी RMU (RING MAIN UNIT) बसविण्यासाठी जागा निश्चित करण्यात आल्या. जलवायु विहार सोसायटी बाहेर, साधू वासवानी स्कूल कॉर्नर आणि महाराजा चौक परिसर या ठिकाणी RMU बसवण्यात येत आहेत.

दोन आरएमयू युनिट्स आधीच उपलब्ध झाल्यानंतर तिसरे युनिटही प्राप्त झाले असून, या आरएमयू बसवण्याच्या कामाचा शुभारंभ कामगार नेते सचिन लांडगे यांच्या शुभहस्ते करण्यात आला. यावेळी माजी नगरसेविका नम्रता लोंढे, सामाजिक कार्यकर्ते योगेश लोंढे आणि स्थानिक नागरिक उपस्थित होते.

> "'आरएमयू' युनिट्स बसविण्यामुळे उच्चदाब वाहिनीचे विभाजन करता येणार असून, पुढे कोणत्याही परिसरात बिघाड झाल्यास फक्त त्या भागाचा पुरवठा बंद ठेवता येईल आणि उर्वरित परिसर सुरळीत सुरू राहील. त्यामुळे वीजपुरवठा खंडित होण्याच्या घटना लक्षणीयरीत्या कमी होतील, तसेच तक्रारींचे निरसन जलदगतीने होईल. यामुळे मोशी प्राधिकरणातील नागरिकांना वारंवार होणाऱ्या विजेच्या अडचणींमधून मोठा दिलासा मिळणार आहे. भोसरी विधानसभा मतदार संघातील वीज पुरवठा सक्षम करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.
> **–महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.



भूमिका

# आत्महत्या करण्याएवढे हतबल का होतात?

**महाराष्ट्रात सातारा जिल्ह्यातील फलटण येथील शासनाच्या ग्रामीण आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी असलेल्या तरुणीच्या आत्महत्येमुळे सध्या महाराष्ट्रात वातावरण तापले आहे. पंजाबमधील माजी पोलीस महासंचालक मोहम्मद मुस्तफा आणि त्यांची पत्नी व पंजाबमधील माजी मंत्री रझिया सुलतान यांच्या अकील अख्तर या ३८ वर्षीय मुलाने १६ ऑक्टोबर २०२५ रोजी आत्महत्या केली.**

मिलिंद म्हैसकर आणि मनिषा म्हैसकर पाटणकर या आयएएस दाम्पत्याच्या किशोर वयीन मुलाने आत्महत्या केली. विकास रस्तोगी आणि राधिका रस्तोगी या अन्य एका आयएएस दाम्पत्याच्या तरुण मुलीनेही हाच मार्ग स्वीकारला. ही झाली ठळक उदाहरणे, पण आत्महत्या केल्याच्या किंवा आत्महत्येच्या प्रयत्नाच्या बातम्या वृत्तपत्रांत जवळपास रोज दिसतात. त्यातल्या काहींची चर्चा होते, तर काही एका दिवसापुरता बातमीचा विषय होऊन विरून जातात. या अशा आत्महत्या आणि त्यांच्या कायदेशीर बाबी, पोलिस तपास, त्यानंतर केली जाणारी कारवाई यापेक्षा भेडसावणारा मुख्य प्रश्न म्हणजे, आत्महत्या का होतात? शिक्षणाने माणूस एक जबाबदार नागरिक झाला पाहिजे अशी रास्त अपेक्षा असते. आपले प्रश्न सोडविण्याचे मार्ग शोधण्याची क्षमता त्याच्यात निर्माण झाली पाहिजे. आपल्यापुढील आव्हानांचा सामना करण्यासाठी, अन्याय



झाला असल्यास त्याविरुद्ध दाद मागण्यासाठी संविधानाने निर्माण केलेले विविध मार्ग, आपले प्रश्न सोडवू शकतील अशा शासकीय, निमशासकीय, स्वयंसेवी संस्था, संबंधित क्षेत्रातील तज्ज्ञ यांच्यापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला गेला पाहिजे. या सर्वांनीही अशा मानसिक घुसमट सहन करणाऱ्यांना मदत करण्यासाठी सदैव तत्पर असले पाहिजे. मात्र प्रत्यक्षात असे होताना दिसत नाही. अनेकदा यंत्रणांकडे दाद मागूनह प्रश्न सुटत नाहीत. त्यामुळे आधीच निराश झालेली व्यक्ती हतबल होते.

परिस्थितीतून बाहेर पडण्याचा काहीच मार्ग दिसत नसल्याने शेवटी ती व्यक्ती आत्महत्या हाच शेवटचा मार्ग समजून त्या दिशेने पाऊल उचलते. गेल्या काही वर्षांमध्ये आत्महत्या वाढण्याची काही कारणे म्हणजे उद्ध्वस्त होत चाललेली कुटुंब व्यवस्था, आधुनिक तंत्रज्ञानाचे व्यक्तीच्या मनावर, जीवनावर, नातेसंबंधांवर होणारे प्रतिकूल परिणाम, स्वत:विषयी स्वत:च्या आणि समाजाच्या अवास्तव अपेक्षा, स्वतःच्या मनाचा कल ओळखता न येणे, जीवघेणी स्पर्धा, कामातून निर्माण होणारा ताण तणाव, एकटेपणाची भावना, नैराश्य इत्यादी.काही उदाहरणे पाहूया. ज्या आयआयटीत प्रवेश मिळावा म्हणून विद्यार्थी आणि त्यांचे पालक जीवाचे रान करतात, त्या विविध आयआयटीत पहिल्या ते चौथ्या वर्षात शिकत असलेल्या ११५ मुलामुलींनी गेल्या १० वर्षांत आत्महत्या केल्या आहेत. ज्या एमबीबीएस, एमडी, एमएस अभ्यासक्रमांसाठी दिवसरात्र अभ्यास करून, प्रवेश परीक्षेची तयारी करून, लाखो रुपये खर्च करून प्रवेश परीक्षा उत्तीर्ण होऊन प्रवेश मिळविला जातो त्या अभ्यासक्रमांना प्रवेश मिळालेल्या १२२ विद्यार्थ्यांनी गेल्या पाच वर्षांत आत्महत्या केल्या आहेत. पोलीस आणि सैन्य दलातील अधिकारी, जवान हे शरीराने धट्टेकट्टे असतात. पण ते मनाने सुद्धा तितकेच सुदृढ असणे गरजेचे असते. भारतात गेल्या पाच वर्षांत पोलीस दलातील ९३०, लष्करातील ६४२, वायू सेनेतील १४८ तर नौदलातील २९ अशा एकूण ८२९ जणांनी मृत्यूला कवटाळले आहे. ही संख्या काय दर्शवते? २०२३ या एका वर्षात १०,७८६ शेतकऱ्यांनी, शेतीवर आधारित उपजिविका करणाऱ्यांनी जीवन संपवले. ही केवळ नोंद झालेली आकडेवारी. प्रत्यक्षात हा आकडा बराच मोठा असू शकतो.आत्महत्या करणाऱ्या व्यक्तीच्या मनात किती टोकाचे नैराश्य दाटून येत असेल, याचा विचार होणे गरजेचे आहेच, मात्र त्या व्यक्तीच्या कुटुंबीयांचे उर्वरित आयुष्य किती खडतर होत असेल, यावरही विचार झाला पाहिजे. हा प्रश्न केवळ कुटुंबापुरताच सीमित राहतो का? तर नाही. इतक्या बुद्धिमान, साहसी, आपापल्या क्षेत्रात दीर्घकाळ योगदान देऊ शकतील अशा तरुणांची वाटचाल अशी अकाली संपुष्टात येणे ही संपूर्ण समाज आणि देशाचीही मोठी हानी आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची किमान विधिमंडळांत, संसदेत तरी चर्चा होते. हा अनेकदा प्रसारमाध्यमांत चर्चेचा विषय ठरतो, निवडणुकांत प्रचाराचा मुद्दा ठरतो. पण इतर क्षेत्रांतील आत्महत्यांचे काय?

## प्रासंगिक »

# वाजले की बारा

***प्रश्न केवळ कोणा पक्षाच्या कार्यालयात लावणी सादर झाली एवढाच नसून राजकीय पक्षांमधील स्त्रियांना दिल्या जाणाऱ्या वागणुकीचा आहे...***

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अजित पवार गटाच्या नागपूर येथील नव्याने सुशोभीकरण केलेल्या कार्यालयात दीपावली मीलन या कार्यक्रमानिमित्त 'सामाजिक योद्ध्यां'चा सन्मान केल्यानंतर कार्यकर्त्यांचे वैयक्तिक कलागुण सादर करण्याच्या मिषाने जी काही बहार उडवून दिली गेली आहे, तिला तोड नाही. त्या कार्यक्रमात म्हणे आपापले कलागुण सादर करण्याचे आवाहन केले गेले, र पक्षसदस्य म्हणून दाखल झालेल्या लावणी कलावंताने 'वाजले की बारा' ही लावणी सादर केली. त्या सादरीकरणाची चित्रफीत समाजमाध्यमांवरून फिरू लागली आणि नेमके कुणाचे बारा वाजले आणि कुणी घरी जायला हवे याची चर्चा सुरू झाली. आता पक्ष कार्यालयात सगळे पक्षाचेच लोक असताना ही चित्रफीत कशी काय बाहेर आली आणि समाजमाध्यमांवर फिरली हा वेगळाच मुद्दा. पण त्या नृत्याची चर्चा झाली.

'नागरी ड्रोन (प्रोत्साहन आणि नियमन) विधेयक २०२५'मध्ये अनेक नियमभंगांसाठी थेट कैदेची शिक्षा आहे. ड्रोन जप्त करण्याचे 'विवेकाधीन अधिकार' पोलिसांना बहाल करण्यात आले आहेत. अशाने पंतप्रधान मोदींचे 'भारताला ड्रोन तंत्रज्ञानाचे जागतिक केंद्र' बनवण्याचे स्वप्न कसे पूर्ण होणार?

# ड्रोन उद्योगाचे पंख कापणारे विधेयक

ड्रोनचा वापर भारतात सुरू झाला, तेव्हा सर्वसामान्यांच्या कल्पकतेला बहर आला होता- ही मानवरहित सूक्ष्मविमाने वापरून गणपतीच्या मिरवणुकीत पुष्पवृष्टी तर सुरू झालीच, पण 'आता वाणसामानही ड्रोनने येणार' आदी दिवास्वप्ने रंगवली जाऊ लागली. तसे काही होणार नव्हते, पण त्यानंतरच्या काही वर्षांत ड्रोनचा नागरी वापर वाढण्याऐवजी कमी झाल्याचे दिसले. कारण ड्रोनच्या नागरी वापरावर २०१४ पासून, 'नियम तयार होईपर्यंत' बंदी घालण्यात आली होती. मग २०१८ मध्ये नागरी हवाई वाहतूक खात्याने प्रसृत केलेल्या 'नागरी विमान वाहतूक आवश्यकता नियमावलीत, 'परवानगी नाही, तर उड्डाण नाही' हा नियम ड्रोनलाही लागू करण्यात आला. त्याचे स्वागतही झाले, पण प्रत्यक्षात हा नियम वैतागवाणा ठरला आणि अयशस्वी झाला. याचे कारण, मागेल त्याला शहानिशा करून परवानगी देण्याइतक्या क्षमतेच्या डिजिटल पायाभूत सुविधा आपल्याकडे



नसतानाच हे नियम लागू झाले होते. परवाने सुलभ करा, अशी ओरड तीन-चार वर्षे होत राहिल्यानंतर, २०२१ च्या सुरुवातीला मानवरहित विमान प्रणाली नियमांमध्ये बदल केला, तोही चुकीचा आहे, हे पटल्यानंतर सरकारने २०२१ अखेरीस नवे 'ड्रोन नियम' करून निर्णायक म्हणावे असे पाऊल टाकले- यामुळे परवाना सुलभ झाला, प्रयोगांना परवानगी मिळाली आणि एकंदर ड्रोन वापराला गती मिळाली. या साऱ्याची आठवण आत्ताच अशासाठी की, आता 'नागरी ड्रोन (प्रोत्साहन आणि नियमन) विधेयक २०२५' अशा नव्या विधेयकाचा मसुदा तयार झाला आहे. हा ड्रोनच्या प्रवासातला नवीन टप्पा आहे. परंतु आधीच्या दशकभरात आपण 'बंदी' पासून 'सुलभ परवाना प्रक्रिया' इथवर येताना काय काय शिकलो हे सारे नव्या विधेयकात विसरलेच गेले की काय, अशीही शंका घ्यायला जागा आहे.हे प्रस्तावित विधेयक सध्या आहे त्याच स्थितीत प्रत्यक्षात आले तर परिणाम काय होतील? परवानग्या खुल्या होणे सोडाच, पण सध्याच्या मसुद्यातून चटकन लक्षात येते की, हे विधेयक कठोर दंड लागू करणारे आणि संशोधन आणि विकासाचे मार्ग बंद करणारे आहे. शिवाय, आपल्या अन्य कायद्यांसारखेच ते मोघम असल्याने, नंतर प्रशासनाकडून वेळोवेळी काय नियम केले जातात, यावरच त्याचे परिणाम अवलंबून राहातील. पण एकंदर या विधेयकामुळे ड्रोन उद्योगाच्या वाढीला गती येण्याऐवजी, उद्योग मंदावण्याचा धोका अधिक आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी जाहीर भाषणात म्हणाले होते त्याप्रमाणे जर भारताला 'ड्रोन तंत्रज्ञानाचे जागतिक केंद्र' बनायचे असेल, तर या विधेयकातल्या दृष्टिकोनाचा पुनर्विचार करावा लागेल.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

सिकंदरची सुटका करावी

## सिकंदरच्या अटकेनंतर वडिलांनी केला आरोप

# माझ्या मुलाने काही चुकीचे केले नाही

| मुंबई |

प्रतिनिधी : महाईन्यूज

**आंतरराष्ट्रीय कुस्तीपटू आणि महाराष्ट्र केसरीत सहभागी झालेला पैलवान सिकंदर शेख याला पंजाब पोलिसांनी अवैध शस्त्रांच्या तस्करी प्रकरणात अटक केली आहे. यामुळे राज्यातील कुस्ती क्षेत्रात खळबळ उडाली. राजस्थानमधील पपला गुर्जर या आंतरराज्यीय टोळीशी सिकंदरचे संबंध असल्याचा आरोप पोलिसांनी केला आहे.**

## आम्ही खूप कष्टाने पुढे आलो



मात्र सिकंदरला या प्रकरणात गोवण्यात आले आहे आहे, असा आरोप त्याच्या कुटुंबाने केला आहे. तर वडील रशीद शेख यांनी पंजाब पोलिसांना विनंती करून सिकंदरची सुटका करावी, असे आर्जव केले आहे. वडील रशीद शेख माध्यमांशी बोलताना म्हणाले, “माझ्या मुलाने काहीही चुकीचे केलेले नाही. माझे पंजाब पोलिसांना आवाहन आहे की, त्यांनी माझ्या मुलाला सोडून द्यावे. मला अद्याप या प्रकरणाची काहीही माहिती पोलिसांकडून मिळाली नाही. सिकंदरने आजवर सर्व कष्टाने मिळवले आहे. सिकंदरशिवाय आम्हाला कोणताही आधार नाही.”सिकंदर शेख अजून चार ते पाच वर्ष कुस्ती खेळू शकतो. आम्ही खूप कष्टाने पुढे आलो आहोत. आमच्या लेकरावर अन्याय करू नका. महाराष्ट्र केसरी पासून त्याने राष्ट्रीय पातळीवरची पदके मिळवली. लष्करातही तो भरती झाला. पंजाब पोलिसांना माझी कळकळीची विनंती आहे की, सिकंदरला सोडून द्यावे. सिकंदरला जर कुणी अडकविण्याचा प्रयत्न करत असेल, तर त्यांनाही विनंती करतो की, गरीबाच्या लेकराला अडकवू नका, असे भावनिक आवाहन रशीद शेख यांनी केले.पंजाब पोलिसांनी केलेल्या आरोपांवर बोलताना रशीद शेख म्हणाले, “आमच्या धर्मात चुकीच्या कामांना थारा नाही. मी आजवर हरामचा पैसा कमावला नाही, तर माझा मुलगा कुठून असे काम करणार? माझ्या मुलावर पंजाबनेही प्रेम केले आहे. त्याने पंजाबमध्ये अनेक कुस्त्या खेळल्या आहेत. हिंद केसरी जवळ आल्यामुळे त्याच्यावर काहीतरी संकट आले असावे.

”सिकंदर शेखने कोल्हापूरमधील ज्या तालमीत कुस्तीचे धडे घेतले, त्या तालमीतील प्रशिक्षक दीनानाथ सिंह यांनी सिकंदरच्या अटकेनंतर आश्चर्य व्यक्त केले. आमच्या तालमीला न भरून येणारी जखम झाली आहे. आमच्या तालमीचा संबंध छत्रपती शाहू महाराजांशी आहे. पैशांची लालसा असल्यावर हातून अशा चुका घडतात. सिकंदर एवढ्या खालच्या स्तराला जाईल, असे कधी वाटले नव्हते. त्याने असे करायला नको होते. पंजाबमधील मोहाली पोलिसांनी शुक्रवारी (३१ ऑक्टोबर) ही कारवाई केली. अटक केलेल्या आरोपींचा पपला गुर्जर टोळीशी संबंध असल्याचे सांगण्यात आले. या कारवाईत पोलिसांनी पाच पिस्तूल, जिवंत काडतुसे, रोख रक्कम आणि दोन वाहने जप्त केली. अटक केलेल्यांपैकी दानवीर (२६) आणि बंटी (२६) हे दोघे उत्तर प्रदेशमधील आहेत. कृष्ण कुमार उर्फ हॅप्पी गुर्जर (२२) हा मोहालीचा रहिवासी आहे. तर सिकंदर शेखही (२६) सध्या मोहाली येथे राहण्यास होता. वरिष्ठ पोलीस अधीक्षक हरमनदीप सिंग हंस यांनी दिलेल्या माहितीनुसार, मुथरा येथील दोघजण मोहाली येथे शस्त्र घेऊन येणार आहेत, अशी गुप्त माहिती खरारच्या सीआयए कर्मचाऱ्यांना २४ ऑक्टोबर रोजी मिळाली होती. या माहितीच्या आधारे खरार-मुल्लानपूर विमानतळ रस्त्यावर संशयितांना पोलिसांनी रोखले. त्यांच्याकडे शस्त्रसाठा सापडल्यानंतर विविध कलमांखाली गुन्हा दाखल केला. मात्र सिकंदरला या प्रकरणात गोवण्यात आले आहे तर वडील रशीद शेख यांनी पंजाब पोलिसांना विनंती करून सिकंदरची सुटका करावी, असे आर्जव केले आहे.

### गरीबाच्या लेकराला अडकवू नका

रशीद शेख माध्यमांशी बोलताना म्हणाले, “माझ्या मुलाने काहीही चुकीचे केलेले नाही. माझे पंजाब पोलिसांना आवाहन आहे की, त्यांनी माझ्या मुलाला सोडून द्यावे. मला अद्याप या प्रकरणाची काहीही माहिती पोलिसांकडून मिळाली नाही. सिकंदरने आजवर सर्व कष्टाने मिळवले आहे. सिकंदरशिवाय आम्हाला कोणताही आधार नाही.”सिकंदर शेख अजून चार ते पाच वर्ष कुस्ती खेळू शकतो. आम्ही खूप कष्टाने पुढे आलो आहोत. आमच्या लेकरावर अन्याय करू नका.

# कार्तिकी यात्रेला वैष्णवांची मांदियाळी

## पंढरी दुमदुमली पावसामुळे भाविकांची संख्या घटली

| मुंबई |

प्रतिनिधी : महाईन्यूज

**‘काया ही पंढरी आत्मा हा विठ्ठल... नांदतो केवळ पांडुरंग...’ या अभंगाप्रमाणे पंढरीत कार्तिकी यात्रेला वैष्णवांची मांदियाळी जमली आहे. पंढरी टाळ-मृदंगाचा गजर, हरिनामाच्या जयघोषाने दुमदुमून निघाली आहे. मात्र, यंदा पावसामुळे भाविकांची संख्या कमी झालेली दिसून आली. दशमीला पंढरीत ३ लाख भाविक दाखल झाले आहेत.**



आज म्हणजे रविवारी एकादशीची शासकीय महापूजा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते होणार आहे. आषाढी एकादशीस निद्रिस्त झालेले विठ्ठल भगवंत कार्तिकी एकादशीस उठतात आणि भक्तांची सेवा करतात, अशी भावना वारकरी संप्रदायात आहे. आषाढीनंतरची सर्वात मोठी एकादशी म्हणून कार्तिकीकडे पाहिले जाते. या कार्तिकी यात्रेला मुंबई, कोकण, मराठवाडा यासह कर्नाटक, आंध्रप्रदेश येथून भाविक दर वर्षी न चुकता येतात. दशमीला पंढरीत जवळपास तीन लाख भाविक दाखल झाले आहेत. चंद्रभागा नदीच्या पैलतीरावरील ६५ एकर जागेत जवळपास दोन लाख भाविक दाखल झाले आहेत. विठ्ठल मंदिर परिसर, मठ, धर्मशाळा आदी ठिकाणी अभंग, कीर्तन, टाळ-मृदंगाचा जयघोष, हरिनामाचा जयजयकार कानी पडत आहे.भाविक पंढरीत आल्यावर चंद्रभागा नदीचे स्नान करतात. यंदा नदीला पाणी सोडण्यात आल्याने भाविकांना स्नान करता येत आहे. याशिवाय वाळवंटात तात्पुरते शौचालय, वीज, सुरक्षारक्षक, महिलांना कपडे बदलण्यासाठी खोली आदी सुविधा देण्यात आल्या आहेत. दशमीला सावळ्या विठुरायाचा पदस्पर्श घेण्यासाठी जवळपास १२ ते १३ तास लागत आहेत. दर्शनरांगेत भाविकांना पिण्याचे पाणी, खाद्यपदार्थ मोफत, तसेच वैद्यकीय सेवा, विश्रांती कक्ष उभारण्यात आल्याची माहिती श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे सहअध्यक्ष हभप गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली आहे. तसेच कोणताही अनुचित प्रकार होऊ नये म्हणून पोलीस बंदोबस्त तैनात आहे. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी शहरात स्वच्छतेला प्राधान्य दिले असून, विविध कामांची पाहणी त्यांनी केली आज म्हणजे रविवारी पहाटे शिंदे यांच्या हस्ते एकादशीनिमित्त शासकीय महापूजा होणार आहे. असे असले, तरी सावळ्या विठुरायाच्या दर्शनाने भाविक समाधानी होत आहेत.

### भाविकांची संख्या घटली

दशमीला म्हणजे शनिवारी सायंकाळी पावसाने हजेरी लावली. अचानक पावसाने भाविकांची तारांबळ उडाली. अनेक ठिकाणी पाऊस पडत असल्याने भाविकांची संख्या घटली आहे. पावसाची शक्यता लक्षात घेऊन मंदिर समितीने दर्शनरांगेत जलरोधक (वॉटर प्रुफ) सुविधा उपलब्ध केली आहे.

पुराव्यासाठीही मागीतले ३ लाख

## ५० लाख देऊनही अमेरिकेचं स्वप्न अधुरंच!

# भारतीय तरुणाची ग्वाटेमाला हत्या!

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**गेल्या वर्षी अमेरिकेत जाण्याचे स्वप्न घेऊन घरातून बाहेर पडलेल्या हरियाणातील एका १८ वर्षीय तरुणाची ग्वाटेमाला येथे हत्या झाल्याचा प्रकार समोर आला आहे. बेकायदेशीर डंकी मार्गाने अमेरिकेत जाण्यासाठी त्याने घर सोडले होते, मात्र त्याच्या आधीच त्याला जीव गमवावा लागला आहे. मानवी तस्करांनी त्याला ओलीस ठेवल्यानंतर त्याची कथितपणे हत्या केल्याचा आरोप त्याच्या कुटुंबीयांनी शनिवारी केला आहे.**

## तस्करांनी हत्या केल्याचा आरोप



मृत तरूणाचे नाव युवराज असे असून तो हरियाणामधील कैथल जिल्ह्यातील एका गावातील शेतकऱ्याचा मुलगा होता. तो गेल्या वर्षी ऑक्टोबर महिन्यात अमेरिकेत काम शोधण्यासाठी गेला होता, असे वृत्त पीटीआयने दिले आहे."युवराजने १२ वी पास केली होती आणि त्याला त्याच्या कुटुंबाला मदत करायची होती. तो नेटवर्कच्या माध्यमातून (NETWORK OF CONTACTS) सुरक्षितपणे अमेरिकेत पोहोचेल असे आम्हाला सांगण्यात आले होते," असे युवराजचे मामा गुरपेज सिंग यांनी वृत्तसंस्थेला बोलताना सांगितले.मानवी तस्करांपैकीच एकाने नुकतेच त्यांना युवराजचे आणि पंजाबच्या आणखी एका तरुणाचे मृत्यूचे प्रमाणपत्र आणि फोटो पाठवले, तेव्हा त्यांना त्यांच्या मृत्यूबद्दल माहिती मिळाली, असे युवराजच्या कुटुंबीयांनी सांगितले. पीटीआयने दिलेल्या वृत्तानुसार, हरियाणामधील तीन ट्राव्हल एजंट्सनी मुलाच्या सुखरूप प्रवासासाठी कुटुंबाकडून मोठी रक्कम घेतली होती. पण पहिले पेमेंट झाल्यानंतर युवराजबरोबरचा संपर्क तुटला असे गुरपेज सिंग यांनी सांगितले. एक महिन्यानंतर कुटुंबाला युवराज आणि दुसऱ्या एका तरुणाला ग्वाटेमाला येथे ओलीस ठेवण्यात आल्याचे व्हिडीओ पाठवण्यात आले. त्यानंतर तस्करांकडून खंडणीची मागणी करण्यात आली."नुकतेच तस्करांपैकी एकाने युवराज याची हत्या झाल्याचा दावा करत संपर्क साधला आणि पुरावा देण्यासाठी ३ लाख रुपयांची मागणी केली. पेमेंट झाल्यानंतर त्याने मृत्यू प्रमाणपत्र आणि फोटो पाठवले," असे मृताच्या काकांनी सांगितले.त्यांनी असेही सांगितले की, कुटुंबाला वाटते की स्थानिक एजंटच्या मार्फत पाठवण्यात आलेले पैसे परदेशातील तस्करांपर्यंत पोहचले नसावेत गुरपेज सिंग यांनी माहिती दिली की, "युवराजच्या कुटुंबाने ट्रॅव्हल एजंट्सना आणि मानवी तस्करी करणाऱ्यांना एकूण ४० लाख ते ५० लाख रुपये इतकी रक्कम दिली." कुटुंबाने यापूर्वी पोलिसांशी संपर्क साधला होता आणि त्यानंतर दोन स्थानिक

## पैसे दिले अन् संपर्क तुटला

तेव्हा त्यांना त्यांच्या मृत्यूबद्दल माहिती मिळाली, असे युवराजच्या कुटुंबीयांनी सांगितले.पीटीआयने दिलेल्या वृत्तानुसार, हरियाणामधील तीन ट्राव्हल एजंट्सनी मुलाच्या सुखरूप प्रवासासाठी कुटुंबाकडून मोठी रक्कम घेतली होती. पण पहिले पेमेंट झाल्यानंतर युवराजबरोबरचा संपर्क तुटला असे गुरपेज सिंग यांनी सांगितले. एक महिन्यानंतर कुटुंबाला युवराज आणि दुसऱ्या एका तरुणाला ग्वाटेमाला येथे ओलीस ठेवण्यात आल्याचे व्हिडीओ पाठवण्यात आले.

एजंट्सना अटक करण्यात आली होती असेही त्यांनी सांगितले. मात्र यानंतर नंतर त्यांना युवराजच्या मृत्यूची माहिती देण्यात आली, असेही ते म्हणाले.हरयाणा, पंजाब आणि इतर राज्यांतील अनेक लोक 'डंकी मार्गांचा' (DUNKI ROUTES) वापर करून अमेरिकेत पोहोचण्याचा प्रयत्न करतात. हे मार्ग किती धोकादायक असू शकतात हे वारंवार सिद्ध झाले आहे. तरीही मानवी तस्करी करणाऱ्याकडून या मार्गांचा वापर केला जातो. अशा वाटेने अमेरिकेत जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या अनेक स्थलांतरितांना अतिशय खराब वागणूक सहन करावी लागली आहे, तसेच शेकडो लोकांना अमेरिकेत बेकायदेशीररित्या प्रवेश केल्यानंतर हद्दपार करण्यात आले आहे.मृत तरूणाचे नाव युवराज असे असून तो हरियाणामधील कैथल जिल्ह्यातील एका गावातील शेतकऱ्याचा मुलगा होता. तो गेल्या वर्षी ऑक्टोबर महिन्यात अमेरिकेत काम शोधण्यासाठी गेला होता, असे वृत्त पीटीआयने दिले आहे."युवराजने १२ वी पास केली होती आणि त्याला त्याच्या कुटुंबाला मदत करायची होती. तो नेटवर्कच्या माध्यमातून सुरक्षितपणे अमेरिकेत पोहोचेल असे आम्हाला सांगण्यात आले होते," असे युवराजचे मामा गुरपेज सिंग यांनी वृत्तसंस्थेला बोलताना सांगितले.मानवी तस्करांपैकीच एकाने नुकतेच त्यांना युवराजचे आणि पंजाबच्या आणखी एका तरुणाचे मृत्यूचे प्रमाणपत्र आणि फोटो पाठवले.

# सार्वभौमत्वासाठी सामूहिक सुरक्षा आवश्यक

## आसिआन शिखर परिषदेत संरक्षणमंत्र्यांचे प्रतिपादन

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**हिंद-प्रशांत क्षेत्र खुले, समावेशक आणि कोणत्याही दबावापासून मुक्त असावे, असे प्रतिपादन भारताचे संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी शनिवारी केले. चीनच्या आक्रमक लष्करी कारवायांबद्दल जागतिक स्तरावर वाढत्या चिंतेच्या पार्श्वभूमीवर त्यांचे वक्तव्य आले.**

क्वालालंपूर येथे आसिआन सदस्य देशांच्या संरक्षण मंत्र्यांच्या आणि गटाच्या संवाद भागीदारांच्या परिषदेत बोलताना सिंह यांनी या प्रदेशातील प्रत्येक देशाचे सार्वभौमत्व सुनिश्चित करण्यासाठी सामूहिक सुरक्षा दृष्टिकोनावर भर दिला.वादग्रस्त दक्षिण चीन समुद्रात चीनच्या वाढत्या लष्करी कारवायांमध्ये अनेक आसिआन सदस्य आणि लोकशाही देश संयुक्त राष्ट्रांच्या समुद्र कायद्यावरील अधिवेशनाचे पालन करण्याची मागणी करत असताना त्यांनी हे वक्तव्य केले. भविष्यातील सुरक्षा केवळ लष्करी क्षमतेवरच अवलंबून नाही तर सामायिक संसाधनांचे व्यवस्थापन, डिजिटल आणि भौतिक पायाभूत सुविधांचे संरक्षण आणि मानवतावादी संकटांना सामूहिक प्रतिसाद यावर देखील अवलंबून असेल. एडीएमएम-प्लस धोरणात्मक संवादांना





व्यावहारिक परिणामांशी जोडणारा आणि या प्रदेशाला शांतता आणि सामायिक समृद्धीकडे नेणारा सेतू बनू शकतो. भारताचा दृष्टिकोन व्यवहारात्मक नाही, तर दीर्घकालीन आणि तत्त्वनिष्ठ आहे.सदस्य देशांच्या संरक्षण मंत्र्यांच्या आणि गटाच्या संवाद भागीदारांच्या परिषदेत बोलताना सिंह यांनी या प्रदेशातील प्रत्येक देशाचे सार्वभौमत्व सुनिश्चित करण्यासाठी सामूहिक सुरक्षा दृष्टिकोनावर भर दिला.वादग्रस्त दक्षिण चीन समुद्रात चीनच्या

## कोणत्याही दबावापासून मुक्त असावे

हिंद-प्रशांत क्षेत्र खुले, समावेशक आणि कोणत्याही दबावापासून मुक्त असावे, असे प्रतिपादन भारताचे संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी शनिवारी केले. चीनच्या आक्रमक लष्करी कारवायांबद्दल जागतिक स्तरावर वाढत्या चिंतेच्या पार्श्वभूमीवर त्यांचे वक्तव्य आले.

वाढत्या लष्करी कारवायांमध्ये अनेक आसिआन सदस्य आणि लोकशाही देश संयुक्त राष्ट्रांच्या समुद्र कायद्यावरील अधिवेशनाचे पालन करण्याची मागणी करत असताना त्यांनी हे वक्तव्य केले. भविष्यातील सुरक्षा केवळ लष्करी क्षमतेवरच अवलंबून नाही तर सामायिक संसाधनांचे व्यवस्थापन, डिजिटल आणि भौतिक पायाभूत सुविधांचे संरक्षण आणि मानवतावादी संकटांना सामूहिक प्रतिसाद यावर देखील अवलंबून असेल. एडीएमएम-प्लस धोरणात्मक संवादांना व्यावहारिक परिणामांशी जोडणारा आणि या प्रदेशाला शांतता आणि सामायिक समृद्धीकडे नेणारा सेतू बनू शकतो. भारताचा दृष्टिकोन व्यवहारात्मक नाही.

## 'अ परफेक्ट मर्डर' नाटकातून हिचकॉकचा जिवंत थ्रिल

हिचकॉक म्हणजे थ्रिलचा राजा! त्यांच्या कलाकृतींमध्ये असलेला गूढपणा, रोमांच आणि भीतीचा सूक्ष्म खेळ नेहमीच मला मोहवतो," असं अभिनेत्री दिप्ती भागवत सांगतात. त्या लवकरच रंगभूमीवर "अ परफेक्ट मर्डर" या नाटकातून मीरा ही मध्यवर्ती भूमिका साकारणार आहेत — आणि ही भूमिका प्रेक्षकांना रहस्याच्या नव्या जगात घेऊन जाणार आहे. हे नाटक सुप्रसिद्ध चित्रपटकार सर अल्फ्रेड हिचकॉक यांच्या क्लासिक कथानकावर आधारित असून लेखक नीरज शिरवईकर आणि दिग्दर्शक विजय केंकरे यांनी त्याला मराठी रंगभूमीचा साज चढवला आहे. "मूळ कथेचा आत्मा कायम ठेवून, मराठी संवेदनांना साजेसं रूपांतर करणं ही मोठी कसोटी होती — आणि आमच्या टीमने ती उत्कृष्टरीत्या पार पाडली," असं दिप्ती म्हणतात.दिप्तीची 'मीरा' ही एक बहुरंगी व्यक्तिरेखा आहे — श्रीमंती, सौंदर्य आणि आत्मविश्वासाने झगमगणारी, पण अंतर्मनात असंख्य प्रश्न आणि भावनांच्या वादळांनी ढवळलेली. या भूमिकेसाठी त्यांना भावनिक खोली आणि संयम दोन्हींची गरज भासली. "प्रत्येक दृश्य हे प्रेक्षकांशी संवाद साधणारं आहे. काही संवाद शब्दात नाहीत, ते नजरेत आहेत — नाटकातील प्रत्येक थांबा, प्रत्येक शांतता काहीतरी सांगून जाते," असं त्या सांगतात.

## प्रसिद्ध बॉलीवूड गायकाने गुपचूप उरकलं लग्न

नवीन वर्षाच्या सुरुवातीला प्रसिद्ध बॉलीवूड गायक अरमान मलिक विवाहबंधनात अडकला आहे. अरमानने त्याच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर फोटो शेअर करून ही आनंदाची बातमी चाहत्यांना दिली. अरमानने त्याची गर्लफ्रेंड आशना श्रॉफशी लग्न केलं आहे. मागील बऱ्याच वर्षांपासून अरमान व आशना रिलेशनशिपमध्ये होते. अखेर दोघांनी लग्नगाठ बांधली असून आयुष्यातील नवीन प्रवासाला सुरुवात केली आहे. 'मैं रहूँ या ना रहूँ', 'जेहर', 'बोल दो ना जरा', 'पहेला प्यार', 'मुझको बरसात बना लो' अशा अनेक लोकप्रिय गाण्यांचा गायक अरमान मलिकने आयुष्यातील नवीन इनिंग सुरू केली आहे. अरमानने त्याची गर्लफ्रेंड आता पती-पत्नी झाले आहेत. अरमानने इन्स्टाग्रामवर लग्नातील फोटो पोस्ट केले आहेत. 'तू है मेरा घर' असं कॅप्शन अरमानने या फोटोंना दिलं आहे. अरमान मलिकने पत्नी आशनाला टॅग करत लग्नाचे ६ फोटो शेअर केले आहेत, ज्यामध्ये ते दोघेही लग्नाचे विधी पूर्ण करताना दिसत आहेत. अरमान व आशना यांच्या लग्नातील लूकची खूप चर्चा होत आहे. आशना केशरी रंगाच्या लेहेंग्यात खूप सुंदर दिसत आहे, तर अरमानने फिकट गुलाबी रंगाची शेरवानी घातली आहे, दोघेही एकत्र खूप क्यूट दिसत आहेत.

## अफेअरच्या चर्चांबद्दल त्रास

बॉलीवूड अभिनेता आमिर खान (AAMIR KHAN) त्याच्या वैयक्तिक आयुष्यामुळे अनेक कारणाने चर्चेत राहत असतो. अशातच नुकतंच त्याने त्याच्या ६० व्या वाढदिवसानिमित्त नवीन नात्याची घोषणा केली. २५ वर्षांपासूनची मैत्रीण असलेल्या गौरीबरोबर रिलेशनमध्ये असल्याचं आमिरने सांगितलं. गौरीबरोबर आमिरचे हे तिसरे रिलेशनशिप असून याआधी त्याची दोन लग्न झाली आहेत. त्याने पहिलं लग्न रीना दत्ताशी केलं होतं. या दोघांना आयरा आणि जुनैद ही मुलं आहेत. लग्नाच्या १५ वर्षांनंतर त्यांनी घटस्फोट घेतला. त्यानंतर आमिरने किरण रावशी दुसरं लग्न केलं. किरण रावसोबतही आमिरचा संसार १५ वर्षे टिकला. यादरम्यान, आमिरचे नावं इतरही काही अभिनेत्रींबरोबर जोडली गेली होती. किरण रावला घटस्फोट दिल्यानंतर आमिर आणि 'दंगल' फेम अभिनेत्री फातिमा सना शेख (FATIMA SANA SHAIKH) यांच्या अफेअरच्या चर्चा रंगल्या होत्या. किंबहुना फातिमामुळेच आमिरने किरणला घटस्फोट दिल्याचं म्हटलं गेलं होतं. याबद्दल आता स्वत: फातिमाने भाष्य केलं आहे. नुकत्याच एका मुलाखतीत अभिनेत्रीने या अफेअरच्या चर्चांबद्दल सांगितलं. फिल्मफेअरशी संवाद साधताना फातिमाला आमिर खानबरोबरच्या अफेअरच्या चर्चांबद्दल विचारण्यात आले. यावेळी अभिनेत्रीने उत्तर डेट म्हणाले की, "मला याचा त्रास व्हायचा कारण यापूर्वी अशा गोष्टींचा कधी सामना केलेला नाही. काही अनोळखी लोक आहेत, ज्यांना मी कधीही भेटलेही नाही, ते माझ्याबद्दल काहीतरी लिहीत आहेत. त्या लोकांना यात काही तथ्य आहे .



## 'मी टू' प्रकरणात झालेले आरोप

दिग्दर्शक साजिद खान २०१८ मध्ये 'हाउसफुल ४'चे शूटिंग करताना त्याच्यावर अनेक महिलांनी #METOO मोहिमेंतर्गत लैंगिक शोषणाचे आरोप केले होते. या आरोपांमुळे त्याचे जीवन पूर्णतः बदलून गेले. तब्बल सहा वर्षे त्याने याबाबत मौन बाळगले. अलीकडेच त्याने एका मुलाखतीत या संदर्भात वक्तव्य केले आहे. साजिद खानने 'हिंदुस्तान टाइम्स'ला दिलेल्या मुलाखतीत गेल्या सहा वर्षांच्या काळाबद्दल सांगितले. साजिद म्हणाला, "या सहा वर्षांत अनेक वेळा स्वतःला संपवण्याचे विचार माझ्या मनात आले. भारतीय चित्रपट आणि दूरचित्रवाणी दिग्दर्शक संघटनेनं (IFTDA) परवानगी दिल्यानंतरही मला काम मिळालं नाही. या काळात कमाई नसल्यानं मला माझं घर विकावं लागलं आणि भाड्याच्या फ्लॅटमध्ये राहावं लागलं."साजिद म्हणाला, "करिअरच्या सुरुवातीच्या काळात, मी केवळ चर्चेत राहण्यासाठी खळबळजनक गोष्टी बोलत असे. जेव्हा मी टीव्हीवर काम करीत होतो, तेव्हा माझं काम लोकांचं मनोरंजन करणं होतं. पण, माझ्या काही वक्तव्यांनी मी अनेक लोकांना नाराज केलं. आज मी माझ्या काही जुन्या मुलाखती पाहतो, तेव्हा मला वाटतं की मी टाईम मशीन घेऊन जाऊन स्वतःला थांबवावं आणि सांगावं, 'अरे मूर्खा, तू काय बोलतो आहेस?. जेव्हा माझ्या वक्तव्यांनी लोकांची मनं दुखावली जात आहेत याची मला जाणीव झाली, तेव्हा मी त्यांची माफी मागितली."साजिद पुढे म्हणाला, "जेव्हा तुमच्याकडे काम नसतं, तेव्हा तुम्ही तुमच्या जीवनाबद्दल विचार करू लागता. आता मी शांत झालो आहे. आता मी केवळ कामावर लक्ष केंद्रित करू इच्छितो."

## कंगनाला आलं एक लाख वीज बिल

बॉलीवूड अभिनेत्री आणि हिमाचल प्रदेशच्या मंडीची खासदार कंगना रणौतने कायमच कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत राहत असते. ती अनेकदा राजकीय व मनोरंजन क्षेत्राशी संबंधित विषयांवर भाष्य करत असते. अशातच कंगणा एका विशेष कारणाने चर्चेत आली आहे आणि हे कारण म्हणजे तिला आलेलं विजेचं बिल. वीज बिलाचा मोठा झटका लागला आहे. याविरोधात तिने काँग्रेसच्या नेतृत्वाखालील हिमाचल प्रदेश सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. हिमाचल प्रदेशमधील मंडी इथं नुकत्याच झालेल्या एका राजकीय कार्यक्रमादरम्यान कंगना यांनी काँग्रेसवर जोरदार टीका केली. यावेळी तिने तिच्या मनालीमधील घराचं वीज बिल एक लाख रुपये आल्याचं सांगितलं आहे. कंगनाचं मुंबईशिवाय मनालीमध्येही एक घर आहे आणि तिच्या याचं घराचं वीज बिल लाख रुपये झाल्याने कंगणाला मोठा धक्का धक्का बसला आहे. विशेष म्हणजे या घरात कंगना क्वचितच राहत असल्याचे तिने स्वत: सांगितलं आहे. मंगळवारी मंडीमधील बल्ह विधानसभा क्षेत्रातील लोकांना संबोधित करताना कंगना म्हणाली की, "या महिन्यात माझ्या मनालीतील घराचं विजेचं बिल १ लाख रुपये आलं. या घरात मी राहतही नाही. इतकी दुर्दशा केलेली आहे. शरम वाटते की हे काय होत आहे. हिमाचल प्रदेशची अवस्था पाहणे वेदनादायक आहे."यापुढे तिने म्हटलं आहे की, "आपल्याकडे एक संधी आहे. तुम्ही सर्वजण जे मला माझ्या भावाबहिणींसारखे आहेत, तुम्ही ग्राऊंड लेव्हलला इतकं काम करता. आपलं दायित्व आहे की, आपल्याला या देशाला, या प्रदेशाला प्रगतीच्या मार्गावर घेऊन जायचंय. मी तर म्हणेन की, हे सर्वजण लांडगे आहेत आणि आपल्याला त्यांच्या तावडीतून बाहेर पडायचं आहे." तिच्या या विधानाची सध्या सर्वत्र चर्चा होत आहे.कंगणा मनोरंजन क्षेत्रासह राजकीय क्षेत्रातही बरीच सक्रीय असते. २०२४ मध्ये तिने राजकारणात प्रवेश केला. हिमाचल प्रदेशातील मंडी या मतदारसंघातून निवडणूक लढवली होती आणि तिथे तिचा विजय झाला होता. कंगणाने भाजपकडून ही निवडणूक लढवली होती. तर अभिनेत्रीचा नुकताच 'इमर्जन्सी' चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आला होता. यात तिने इंदिरा गांधी यांची भूमिका साकारली होती. दरम्यान, कंगणाच्या 'इमर्जन्सी' चित्रपटाला प्रेक्षकांकडून संमिश्र प्रतिसाद मिळाला होता. यानंतर आता ती अभिनेता आर. माधवनबरोबरच्या आगामी चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. त्यामुळे तिच्या या चित्रपटाची सर्वांना उत्सुकता लागून राहिली आहे.



कौर ओक्साबोक्शी रडली

## कौर फायनलपूर्वी पत्रकार परिषदेत काय म्हणाली?

# कोचला मिठी मारुन कौर रडली!

## कौरने ८९ धावांची उत्कृष्ट खेळी

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**हरमनप्रीत कौरच्या नेतृत्त्वाखाली भारतीय संघ महिला विश्वषक २०२५ च्या अंतिम सामन्यात पोहोचला आहे. वर्ल्डकपमधील अंतिम सामना भारत आणि दक्षिण आफ्रिका महिला संघांमध्ये खेळवला जाणार आहे. याफायनलपूर्वी पत्रकार परिषदेसाठी उपस्थित असलेल्या कर्णधार हरमनप्रीत कौर हिने उपांत्य सामन्यात संघ जिंकताच फार भावुक होत रडताना दिसली होती, याबाबत प्रतिक्रिया दिली आहे.**






उपांत्य सामन्यात टीम इंडियाने ७ वेळा वर्ल्ड चॅम्पियन ठरलेल्या ऑस्ट्रेलिया संघाचा पराभव केला. जेमिमा रॉड्रीग्जने ११९ धावांची शतकी खेळी करत संघाच्या विजयात मोठी भूमिका बजावली. तर हरमनप्रीत कौरने ८९ धावांची उत्कृष्ट खेळी केली आणि जेमिमासह १६८ धावांची मॅचविनिंग भागीदारी रचली. भारताने ३३९ धावांचं विश्वविक्रमी लक्ष्य गाठत विजय मिळवला आणि अंतिम फेरीत धडक मारली.भारताला विजयासाठी शेवटच्या २ षटकांमध्ये ९ धावांची गरज होती. पहिल्याच चेंडूवर अमनजोत कौरने चौकार लगावला आणि एकच उत्साहाचं वातावरण पाहायला मिळालं. तर डगआऊटमध्ये हरमनप्रीत कौर प्रचंड इमोशनल झालेली दिसली. त्यानंतर पुढच्या चेंडूवर अमनजोतने मोठा फटका मारला, पण चेंडू सीमारेषेच्या आतमध्ये पडला आणि २ धावा काढल्या. त्यानंतर तिसऱ्या चेंडूवर चौकार लगावत भारताचा विजय निश्चित होताच हरमनप्रीत कौरने विजयाचा आनंद साजरा केला.

भारतीय संघ जिंकताच हरमनप्रीत कौरने कोचला मिठी मारून रडताना दिसली. हरमन या विजयानंतर खूप भावूक झालेली पाहायला मिळाली. हरमनच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने अनेक चढ-उतार पाहिले, पण अखेरीस विजयाची रेषा पार करत भारताने फायनल गाठल्याचे पाहताच हरमनच्या अश्रूंचा बांध फुटला.पत्रकार परिषदेत हरमनप्रीतला याबाबत प्रश्न विचारताच उत्तर देताना ती म्हणाली, “मी खूप भावनिक आहे; मी खूप वेळा भावुक होऊन रडते. मी फक्त सामना जिंकल्यावर किंवा पराभूत झाल्यावरच रडत नाही तर छोट्या छोट्या प्रसंगांच्या वेळेसही भावुक होते. जेव्हा संघ चांगली कामगिरी करतो तेव्हाही माझ्या डोळ्यात पाणी येतं. सेमीफायनलमध्ये ऑस्ट्रेलियाला हरवणं आणि मानसिकदृष्ट्या आपण त्यांच्यापेक्षा जास्त मजबूत आहोत हे दाखवणं, खूप खास होतं. त्या दिवसापेक्षा मोठं किंवा अधिक खास काहीच नव्हतं.”अशा दिवसांचा अनुभव फार वेळा येत नाही, ज्या दिवशी केवळ क्रिकेटचं नव्हे तर तिकिटं मिळवण्याचंही दडपण असतं. या विश्वचषकानंतर, आणि विशेषत: जर आम्ही विजेते ठरलो, तर बदल फक्त भारतातच नव्हे तर देशांतर्गत क्रिकेटमध्येही मोठ्या प्रमाणावर दिसतील, अशी माझी आशा आहे,” असंही हरमनप्रीत कौर पुढे म्हणाली. उपांत्य सामन्यात टीम इंडियाने ७ वेळा वर्ल्ड चॅम्पियन ठरलेल्या ऑस्ट्रेलिया संघाचा पराभव केला. जेमिमा रॉड्रीग्जने ११९ धावांची शतकी खेळी करत संघाच्या विजयात मोठी भूमिका बजावली. तर हरमनप्रीत कौरने ८९ धावांची उत्कृष्ट खेळी केली आणि जेमिमासह १६८ धावांची मॅचविनिंग भागीदारी रचली. भारताने ३३९ धावांचं विश्वविक्रमी लक्ष्य गाठत विजय मिळवला आणि अंतिम फेरीत धडक मारली.भारताला विजयासाठी शेवटच्या २ षटकांमध्ये ९ धावांची गरज होती.

तर डगआऊटमध्ये हरमनप्रीत कौर प्रचंड इमोशनल झालेली दिसली. त्यानंतर पुढच्या चेंडूवर अमनजोतने मोठा फटका मारला, पण चेंडू सीमारेषेच्या आतमध्ये पडला आणि २ धावा काढल्या. त्यानंतर तिसऱ्या चेंडूवर चौकार लगावत भारताचा विजय निश्चित होताच हरमनप्रीत कौरने विजयाचा आनंद साजरा केला.भारतीय संघ जिंकताच हरमनप्रीत कौरने कोचला मिठी मारून रडताना दिसली.

### छोट्या प्रसंगांच्या वेळेसही भावुक

हरमनच्या नेतृत्त्वाखाली भारतीय संघाने अनेक चढ-उतार पाहिले, पण अखेरीस विजयाची रेषा पार करत भारताने फायनल गाठल्याचे पाहताच हरमनच्या अश्रूंचा बांध फुटला.पत्रकार परिषदेत हरमनप्रीतला याबाबत प्रश्न विचारताच उत्तर देताना ती म्हणाली, “मी खूप भावनिक आहे; मी खूप वेळा भावुक होऊन रडते. मी फक्त सामना जिंकल्यावर किंवा पराभूत झाल्यावरच रडत नाही तर छोट्या छोट्या प्रसंगांच्या वेळेसही भावुक होते.

# श्रेयस अय्यरला रुग्णालयातून डिस्चार्ज!

## दुखापतीतून सावरला ‘या’ कारणामुळे अजूनही भारतात परतणार नाही

।नवी दिल्ली।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारतीय संघातील स्टार फलंदाज आणि वनडे संघाचा नवा उपकर्णधार श्रेयस अय्यरबाबत मोठी अपडेट समोर येत आहे. भारत आणि ऑस्ट्रेलियातील तिसऱ्या वनडे सामन्यादरम्यान झेल घेत असताना श्रेयस अय्यर दुखापतग्रस्त झाला होता. त्यामुळे त्याला रुग्णालयात भरती करण्यात आलं होतं.**



त्याची दुखापत इतकी गंभीर होती की, त्याला आयसीयूमध्ये भरती करण्याची वेळ आली होती. मात्र तो आता ठीक असून त्याला रुग्णालयातून डिस्चार्ज मिळाला आहे.तिसऱ्या वनडे सामन्यादरम्यान ॲलेक्स कॅरीचा झेल घेत असताना त्याच्या बरगड्यांना दुखापत होऊन अंतर्गत रक्तस्राव सुरू झाला होता. त्यामुळे त्याला तातडीने सिडनीतील रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. त्याच्यावर आवश्यक ते उपचार करण्यात आले आहेत. आता त्याची प्रकृती स्थिर असून तो विश्रांती करून लवकरच फिटनेस पुन्हा मिळवण्याच्या प्रयत्नात असणार आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (बीसीसीआयने) आपल्या निवेदनात म्हटले की, “आता त्याची (श्रेयसची) प्रकृती स्थिर आहे. तो सध्या फिटनेस पुन्हा मिळवण्याच्या प्रयत्नात आहे. “बीसीसीआयची वैद्यकीय टीम, सिडनी आणि भारतातील तज्ज्ञांसह, त्यांच्या (खेळाडूच्या) आरोग्याच्या सुधारणेवर खूश आहे. त्यांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला आहे.”यासह बीसीसीआयने श्रेयस अय्यरवर उपचार करणाऱ्या सिडनीतील डॉक्टरांचे देखील आभार मानले आहेत. डॉ. कौरोश हाघीगी आणि त्यांच्या संपूर्ण टीमसह डॉ. दीनशॉ पारदीवाला यांचे देखील आभार मानले.

### अय्यरला विश्रांती दिली जाऊ शकते

पुढील उपचारांसाठी सिडनीत थांबावं लागणार आहे. ज्यावेळी तो पूर्णपणे फिट होईल तेव्हा तो भारतात येऊ शकेल. त्यामुळे तो आणखी काही दिवस क्रिकेटपासून दूर राहू शकतो. येत्या काही दिवसात दक्षिण आफ्रिकेचा संघ भारत दौऱ्यावर येणार आहे. या दौऱ्यावर होणाऱ्या वनडे मालिकेतून श्रेयस अय्यरला विश्रांती दिली जाऊ शकते.

स्मार्ट PCMC SMART CITY

महाईन्यूज™

ePaper

epaper.mahaenews.com

। रविवार ।
। दि. 2 नोव्हेंबर 2025।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## राष्ट्रीय खेळाडू अरुण पाडुळे यांचे मार्गदर्शन

# पिंपरी-चिंचवडच्या राजनंदिनीचा राज्यस्तरावर "कांस्य नेम'!

## दिल्लीत होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेत कामगिरीची संधी

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड शहरातील नेमबाजीनं पुन्हा एकदा राज्यस्तरावर आपली ताकद दाखवून दिली आहे. पिंपरी-चिंचवड राष्ट्रीय रायफल अकादमीमध्ये प्रशिक्षण घेणारी तरुण नेमबाज कु. राजनंदिनी यादव हिने नागपूर येथे नुकत्याच पार पडलेल्या राज्यस्तरीय शालेय नेमबाजी स्पर्धेत प्रभावी कामगिरी करून कांस्यपदकावर आपले नाव कोरले आहे. या उल्लेखनीय यशामुळे तिची दिल्लीत होणाऱ्या राष्ट्रीय शालेय नेमबाजी स्पर्धेसाठी निवड झाली असून, महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करण्याची सुवर्णसंधी तिला लाभली आहे.**

> "राजनंदिनीने अत्यंत शिस्तबद्धपणे आणि सातत्याने सराव करून राज्यस्तरावर उल्लेखनीय यश मिळवले आहे. तिच्यातील नेमबाजीची जाण आणि एकाग्रता प्रभावी आहे. राष्ट्रीय स्पर्धेत ती आणखी उत्कृष्ट कामगिरी करेल, असा मला पूर्ण विश्वास आहे."
> **– अरुण पाडुळे,** राष्ट्रीय खेळाडू व प्रशिक्षक.

राजनंदिनी यादव ही पिंपरी-चिंचवड राष्ट्रीय रायफल अकादमीमधील अनुभवी प्रशिक्षक आणि राष्ट्रीय खेळाडू अरुण पाडुळे यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या काही वर्षांपासून नेमबाजीचे प्रशिक्षण घेत आहे. अवघ्या काही महिन्यांतच तिने प्रचंड प्रगती साधली असून, तिची नेमबाजीतील अचूकता, स्थैर्य आणि शिस्तबद्ध सराव पद्धती अकादमीतील इतर खेळाडूंसाठी प्रेरणादायी ठरत आहेत. १९ वर्षांखालील मुलींच्या गटात झालेल्या या राज्यस्तरीय स्पर्धेत राजनंदिनीने पहिल्याच प्रयत्नात अत्यंत चुरशीच्या लढतीत महाराष्ट्रात तिसरे स्थान मिळवले. तिच्या नेमबाजीतील स्थिर हात, श्वासाचा नियंत्रण आणि नेमकी दृष्टी या गुणांचा प्रत्यय संपूर्ण स्पर्धेदरम्यान आला. तिच्या या यशामुळे अकादमी, प्रशिक्षक, पालक आणि संपूर्ण पिंपरी-चिंचवड शहरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

राजनंदिनीची सुरुवातीपासूनच नेमबाजीबद्दल तीव्र आवड होती. क्रीडाक्षेत्रात काहीतरी वेगळं करायचं या भावनेतून तिने रायफल शूटिंग हा आव्हानात्मक खेळ निवडला. तिच्या या वाटचालीत पालकांचा आणि प्रशिक्षकांचा पाठिंबा महत्त्वाचा ठरला. अकादमीतील नियमित सराव सत्रे, शूटिंग रेंजवरील अनुशासन आणि शारीरिक तंदुरुस्ती यांचा तिने परिपूर्ण समन्वय साधला आहे. राजनंदिनीने राज्यस्तरीय स्पर्धेत कांस्यपदक पटकावत केवळ वैयक्तिक गौरव मिळवला नाही, तर पिंपरी-चिंचवड शहरातील क्रीडाप्रेमींसाठीही अभिमानाचा क्षण निर्माण केला आहे. तिच्या यशानंतर स्थानिक पातळीवरून तिचे अभिनंदन करण्यात येत असून, विविध शैक्षणिक आणि क्रीडा संस्थांकडून तिचा गौरव करण्याची तयारी सुरू आहे.



राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धा डिसेंबर महिन्यात नवी दिल्ली येथे पार पडणार असून, त्यासाठी राजनंदिनी सध्या जोमाने तयारी करत आहे. उच्च पातळीवरील स्पर्धेत सहभागी होण्याची संधी ही तिच्या क्रीडा प्रवासातील एक मोठी पायरी मानली जात आहे.

पिंपरी-चिंचवड राष्ट्रीय रायफल अकादमीने आतापर्यंत अनेक उत्कृष्ट नेमबाज तयार केले आहेत. त्यात आता राजनंदिनीचं नावही अभिमानाने घेतलं जात आहे. या यशामुळे शहरातील इतर तरुणींनाही नेमबाजीसारख्या खेळाकडे आकर्षित होण्याची प्रेरणा मिळेल, असा विश्वास क्रीडा क्षेत्रातील जाणकार व्यक्त करत आहेत.

---

## शहरात २२ ठिकाणी चार्जिंग स्टेशन

## ईव्ही वाहनांसाठी निविदा अंतिम टप्प्यात; बीओटी तत्त्वावर होणार काम

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड:पिंपरी-चिंचवड शहरातील नागरिकांना ईव्ही वाहनांसाठी चार्जिंग करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी महापालिका २२ ठिकाणी खासगी संस्थेद्वारे चार्जिंग स्टेशन उभारणार आहे. मागील तीन वर्षांत अटी-शर्ती बदलत चार वेळा निविदा प्रसिद्ध केली; परंतु प्रतिसाद मिळाला नाही.**



> शहरात २२ ठिकाणी चार्जिंग स्टेशन उभारण्यात येणार आहेत. खासगी संस्थेला काम देण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. लेखा विभागाकडे प्रस्ताव पाठविला आहे. त्यांच्याकडून प्रस्ताव येताच स्थायी समितीची मान्यता घेऊन कामाचा आदेश दिला जाईल. त्यानंतर सहा महिन्यांत स्टेशन उभारली जातील.
> **–अनिल भालसाखळे,** सह शहर अभियंता, विद्युत विभाग, महापालिका

आता अखेर तीन वर्षांनी स्टेशन उभारण्यासाठी एका खासगी कंपनीला काम देण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आली आहे. स्वतः बांधा आणि संचालित करा या तत्त्वावर स्टेशन उभारली जाणार आहेत. पिंपरी-चिंचवडमध्ये २३ लाखांहून अधिक नोंदणीकृत वाहने आहेत. त्यामध्ये ५० हजारांहून अधिक ईव्ही वाहनांचा समावेश आहे. स्वतः बांधा आणि संचालित करा या तत्त्वावर ही स्टेशन उभारली जाणार आहेत. यासाठी महापालिकेला कोणताही खर्च करावा लागणार नाही. संबंधित संस्थेला जागा उपलब्ध करून दिली जाणार आहे. या जागेवर दहा वर्षांकरिता स्वतःच्या खर्चाने महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून वीजपुरवठा घेणे, चार्जिंग स्टेशन उभारणे आणि चालन व देखभाल करणे या बाबी संस्थेने करणे आवश्यक आहे. मात्र, तीन वर्षे महापालिकेच्या निविदाप्रक्रियेला प्रतिसाद मिळाला नाही.

शिक्षण विश्व: पीसीईटी शैक्षणिक संकुलात नवव्या 'आयसीसीयुबीईए

# पिंपरी-चिंचवड शहर पोलीस दलात 322 जागांची भरती

## 30 नोव्हेंबरपर्यंत ऑनलाइन माध्यमातून भरतीसाठी अर्ज स्वीकारले जाणार

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड शहर पोलीस दलात ३२२ पोलीस शिपाई जागांची भरती केली जाणार आहे. ३० नोव्हेंबरपर्यंत ऑनलाइन माध्यमातून भरतीसाठीचे अर्ज स्वीकारले जाणार आहेत. उमेदवारांना अर्ज करण्यासाठी महाराष्ट्र पोलिसांच्या संकेतस्थळावर माहिती उपलब्ध करून देण्यात आली आहे. राज्यातील सर्व पोलीस घटकांमध्ये लेखी परीक्षा एकाच दिवशी आयोजित केली जाणार असल्याने उमेदवार संपूर्ण महाराष्ट्रात फक्त एका घटकातच अर्ज करू शकतो. उमेदवाराने चुकीची माहिती दिल्यास उमेदवार कोणत्याही टप्प्यावर रद्द होईल हे स्पष्ट करण्यात आले आहे.**



पिंपरी-चिंचवड शहर पोलीस भरतीमध्ये सर्वसाधारण उमेदवारांसाठी ९७ जागा, महिला ९७ जागा, खेळाडू १६ जागा, प्रकल्पग्रस्त १६ जागा, भूकंपग्रस्त ६, माजी सैनिक ४८, अंशकालीन पदवीधर १६ जागा, पोलीस पाल्य १०, गृहरक्षक दल १६,अनाथ ३ जागा भरल्या जाणार आहेत. भरती प्रक्रियेत प्रथम शारीरिक चाचणी घेण्यात येईल. त्यामध्ये किमान ५० टक्के गुण मिळवणाऱ्या उमेदवारांमधून १:१० प्रमाणात उमेदवारांची १०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल. उमेदवारांनी लेखी परीक्षेत किमान ४० टक्के गुण मिळवणे आवश्यक आहे.४० टक्क्यांहून कमी गुण मिळवणारे उमेदवार अपात्र समजले जातील.

शारीरिक आणि लेखी चाचणीमधील गुणांच्या आधारे उमेदवारांची एक गुणवत्ता यादी तयार केली जाईल. त्या उमेदवारांची मूळ कागदपत्रे पडताळणी केली जाईल. कागदपत्र पडताळणीमध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांची तात्पुरती निवड यादी तयार केली जाईल. त्यानंतर अंतिम गुणवत्ता यादी तयार केली जाईल. पोलीस भरतीच्या अर्जासाठी उमेदवार दहावी किंवा बारावी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. १८ ते २८ वर्षे वयोगटातील उमेदवारांना अर्ज करता येईल.

> पोलीस भरती करण्याबाबत कोणीही पैशांची अथवा इतर कोणत्याही स्वरूपाची मागणी केल्यास संबंधित उमेदवारांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार करावी. इतर अडचण असल्यास पोलीस भरती समितीचे अध्यक्ष तथा पोलीस आयुक्त यांच्याकडे तक्रार करावी.
>
> **–श्वेता खेडकर,** उपायुक्त तथा अध्यक्ष, पोलीस भरती समिती, पिंपरी-चिंचवड

### प्रवर्गनिहाय भरल्या जाणाऱ्या जागा

ईडब्ल्यूएस ४६
एसईबीसी ३४
इमाव ८०
विमाप्र ८
भ.ज.-ड ७
भ.ज.-क १९
भ.ज.-ब १७
वि.ज.-अ १२
अ.ज. २२
अ. जा. ४२
अराखीव ३५

# शहरात आयएफएससी आशियाई क्लाइंबिंग चॅम्पियनशिप स्पर्धा

## 1 नोव्हेंबर ते 4 नोव्हेंबर याकाळात आयोजन, 13 देशांतील 200 युवा खेळाडूंचा सहभाग

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड महापालिका, इंडियन माउंटेनिअरिंग फाउंडेशन (आयएमएफ) आणि महाराष्ट्र स्पोर्ट क्लाइंबिंग असोसिएशन (एमएससीए) यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्रात प्रथमच आयएफएससी आशियाई किड्स क्लाइंबिंग चॅम्पियनशिप २०२५ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.**




ही स्पर्धा १ नोव्हेंबर ते ४ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत पिंपळे सौदागर येथील योगा पार्कमधील अत्याधुनिक स्पोर्ट क्लाइंबिंग कॉम्प्लेक्स येथे होणार आहे, अशी माहिती पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने देण्यात आली.

आयएफएससी आशियाई किड्स क्लाइंबिंग चॅम्पियनशिप २०२५ या स्पर्धेत १३ देशांतील सुमारे २०० खेळाडू सहभागी होणार असून, स्पीड क्लाइंबिंग, लीड क्लाइंबिंग आणि बोल्डरिंग या तीन थरारक प्रकारांमध्ये १३ आणि १५ वयोगटातील मुले-मुली आपले कौशल्य प्रदर्शित करतील. ही स्पर्धा प्रत्येक भिंतीवरील चढाई ही केवळ वेग आणि कौशल्याचीच नाही, तर मानसिक एकाग्रतेची आणि धैर्याचीही परीक्षा ठरणार आहे.

स्पर्धेचे परीक्षण आयएफएससी व आयएमएफ कडून नियुक्त आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय दर्जाचे स्पर्धाधिकारी करणार असल्यामुळे स्पर्धेतील सर्व निकष जागतिक दर्जाचे राहतील.

पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी मिशनच्या सहकार्याने उभारलेल्या अत्याधुनिक केंद्रात ही स्पर्धा पार पडणार असून हे केंद्र सध्या देशातील सर्वाधिक प्रगत क्रीडा सुविधांपैकी एक मानले जाते. अलीकडेच ऑक्टोबर २०२५ मध्ये पार पडलेल्या २९ व्या आयएमएफ वेस्ट झोन स्पोर्ट क्लाइंबिंग चॅम्पियनशिपने या केंद्राची गुणवत्ता आणि एमएससीएच्या स्वयंसेवकांची तयारी सिद्ध केली आहे. या अनुभवावर आधारित, आशियाई चॅम्पियनशिपचे आयोजन अधिक दर्जेदार होईल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

> या स्पर्धेमुळे पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांना एक अद्वितीय क्रीडा अनुभव मिळणार आहे. अशा उपक्रमांमुळे युवकांमध्ये साहस, शिस्त आणि आत्मविश्वास वाढीस लागतो. महापालिका क्रीडा पायाभूत सुविधा अधिक सक्षम करण्यास कटिबद्ध आहे, आणि ही स्पर्धा त्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल ठरेल.
>
> **—पंकज पाटील,** उपायुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

IFSC ASIAN K CHAMPIONSHIP PIMPRI CHINCHWAD 2025

# प्रा. सारिका गाडेकर यांना संगणकशास्त्र विषयात पीएचडी पदवी प्रदान

## शिक्षण विषय: एमआयटी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाकडून कौतुक

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**एमआयटी कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापक प्रा. सारिका हेमंत गाडेकर यांनी आपल्या शैक्षणिक कारकिर्दीत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. इंदूर येथील डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम विद्यापीठाने त्यांना संगणकशास्त्र विषयात डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी (PH.D.) ही पदवी प्रदान केली आहे. त्यांच्या या शैक्षणिक यशाबद्दल एमआयटी महाविद्यालयात प्राचार्य, प्राध्यापकवर्ग आणि विद्यार्थ्यांकडून त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.**



प्रा. गाडेकर यांनी 'DATA SECURITY ENHANCEMENT IN PUBLIC CLOUD STORAGE USING DATA OBFUSCATION AND STEGANOGRAPHY' या विषयावर सखोल संशोधन केले असून, त्यांचे संशोधन मार्गदर्शन डॉ. अर्पणा भराणी यांनी केले आहे. सध्याच्या डिजिटल युगात 'डेटा सिक्युरिटी' हे अत्यंत महत्त्वाचे आणि आव्हानात्मक क्षेत्र मानले जाते. या क्षेत्रात नाविन्यपूर्ण उपाययोजना शोधून काढत त्यांनी संगणकशास्त्रातील संशोधनाला नवे परिमाण दिले आहे.

### टू वे क्लाऊड सिक्युरिटी फ्रेमवर्क — संशोधनातील अभिनव उपक्रम

डॉ. गाडेकर यांच्या संशोधनाचा मुख्य गाभा म्हणजे सार्वजनिक क्लाऊड संचयनातील डेटाच्या सुरक्षेसाठी विकसित केलेले "टू वे क्लाऊड सिक्युरिटी फ्रेमवर्क" होय. या फ्रेमवर्कमध्ये डेटा ऑब्फ्युसेशन (DATA OBFUSCATION) आणि स्टेगनोग्राफी (STEGANOGRAPHY) या दोन अत्याधुनिक तंत्रज्ञानांचा एकत्रित वापर करण्यात आला आहे.

या पद्धतीद्वारे डेटा निर्माण, साठवण, देखभाल, पुनर्प्राप्ती आणि विलोपन या सर्व टप्प्यांवर माहितीचे सुरक्षित संरक्षण सुनिश्चित करण्यात आले आहे. म्हणजेच, डेटा ट्रान्सफरच्या प्रत्येक प्रक्रियेत माहिती एन्क्रिप्ट (गोंधळवली) केली जाते आणि त्यात लपविण्याच्या (स्टेगनोग्राफिक) तंत्राने अतिरिक्त सुरक्षा स्तर जोडला जातो. ही संकल्पना क्लाऊड स्टोरेजमध्ये असलेली हॅकिंग, डेटा लीकेज आणि अनधिकृत प्रवेश यांसारखी आव्हाने कमी करण्यास मोठी मदत करते. त्यामुळे संस्थात्मक व व्यक्तिगत डेटा सुरक्षेत वाढ होऊन क्लाऊड कम्प्युटिंगवरील विश्वास अधिक दृढ होतो, असे संशोधनातून निष्पन्न झाले आहे.

### डेटा संरक्षणातील सखोल अभ्यास — आधुनिक संगणक तंत्रज्ञानाला दिशा

डॉ. गाडेकर यांनी आपल्या संशोधनात डेटा संरक्षणाच्या क्षेत्रातील विविध आंतरराष्ट्रीय मॉडेल्स आणि पद्धतींचा तुलनात्मक अभ्यास केला. त्यांनी विकसित केलेले फ्रेमवर्क क्लाऊड सेवा प्रदात्यांसाठी तसेच डेटा-आधारित उद्योगांसाठी उपयुक्त ठरू शकते.

त्यांच्या संशोधनाचा हेतू केवळ माहितीचे एन्क्रिप्शन नव्हे, तर डेटा जीवनचक्राच्या प्रत्येक टप्प्यावर त्याची गोपनीयता आणि अखंडता राखणे हा होता. या पद्धतीने डेटा सुरक्षिततेबरोबरच सिस्टम कार्यक्षमता (EFFICIENCY) आणि ॲक्सेस कंट्रोल (ACCESS CONTROL) मध्येही सुधारणा साधता आली आहे. त्यांच्या संशोधनातून क्लाऊड तंत्रज्ञानातील सुरक्षा धोरणांना नवीन दिशा मिळाली असून, डेटा सिक्युरिटीचे 'इंटिग्रेटेड अप्रोच' या दृष्टीकोनातून हे संशोधन अत्यंत मोलाचे ठरले आहे.

### एमआयटी महाविद्यालयात गौरव समारंभ

प्रा. गाडेकर यांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल एमआयटी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात विशेष कार्यक्रम घेऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य, सहकारी प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.






Admission open for 2026-27 | Book Your Spot Today!

8698360005 | 9637339988 | Opp. to Alankapuram Society, Wadmukhwadi, Alandi Road, Pune




**Admission open for 2026-27 | Book Your Spot Today!**

8698360005 | 9637339988 | Opp. to Alankapuram Society, Wadmukhwadi, Alandi Road, Pune